| Article Date | Headline / Summary | Publication |
| --- | --- | --- |
| 01 Jun 2026 | Want to transfer ‘Group Medical Coverage’? | Maharashtra Times (Marathi) |

# ‘ग्रुप मेडिकल कव्हरेज’ हस्तांतर करताय?



अमरनाथ सक्सेना
matawealth@timesofindia.com

**नोकरीसोबत मिळणारे ‘ग्रुप मेडिकल कव्हरेज’ (जीएमसी) हे आरोग्य संरक्षणासाठी उपयुक्त असले, तरी ते केवळ रोजगार टिकून असेपर्यंतच मर्यादित असते. अशा वेळी ‘जीएमसी’ पॉलिसीला वैयक्तिक ‘रिटेल हेल्थ इन्श्युरन्स’मध्ये हस्तांतर करण्याचा पर्याय आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा ठरतो.**

हल्ली अनेक कंपन्या कर्मचाऱ्यांना, कर्मचारी लाभ पॅकेज अंतर्गत ‘ग्रुप मेडिकल कव्हरेज’ (जीएमसी) प्रदान करतात. ‘जीएमसी’ पॉलिसी कर्मचाऱ्यांना मूलभूत हेल्थ इन्श्युरन्स संरक्षण देते; मात्र हे संरक्षण तुम्ही त्या कंपनीमध्ये कार्यरत असतानाच लागू राहते. सन २०२०मध्ये ‘लॉकडाउन’नंतर कामकाज पुन्हा सुरू करणाऱ्या नियोक्त्यांसाठी कर्मचाऱ्यांना ‘ग्रुप मेडिकल इन्श्युरन्स’ देणे ‘इर्डा’ने अनिवार्य केल्यामुळे याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

तुम्ही कधी विचार केला आहे, का की तुमचा पुढील नियोक्ता (कंपनी) ‘जीएमसी’ देत नसेल किंवा मर्यादित संरक्षण देत असेल तर काय होईल? तुम्ही करिअरमध्ये ब्रेक घेण्याचा, ‘फ्रीलान्सर’ म्हणून काम करण्याचा किंवा उद्योजक बनण्याचा निर्णय घेतला, तर तुम्ही काय कराल? मात्र, आता काळजी करण्याची गरज नाही. ‘जीएमसी’ अंतर्गत सुरू असलेली आरोग्यविमा पॉलिसी वैयक्तिक ‘रिटेल हेल्थ पॉलिसी’मध्ये पोर्ट करण्याचा पर्याय तुमच्याकडे उपलब्ध आहे. .

## पॉलिसी हस्तांतर कशी करावी?

सर्वप्रथम, तुमच्या ‘जीएमसी’ पॉलिसीमध्ये तुमच्यावर अवलंबून असलेल्या सदस्यांचा समावेश असेल, तर तुम्ही ती ‘फॅमिली फ्लोटर हेल्थ इन्शुरन्स प्लॅन’मध्ये बदलून घेऊ शकता. पॉलिसीचे संरक्षण तुमच्या एकट्यापुरतेच असेल, तरी तुम्ही वैयक्तिक ‘रिटेल हेल्थ इन्श्युरन्स प्लॅन’मध्ये शिफ्ट बदलून घेऊ शकता. प्रक्रिया सुरू करण्यासाठी, ‘जीएमसी’ देणाऱ्या ‘इन्श्युरर’ला त्याच कंपनीमध्ये पॉलिसी वैयक्तिक प्लॅनमध्ये हस्तांतर करण्याची इच्छा कळवा. ही प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी, ‘ग्रुप कव्हर’ संपण्यापूर्वी किंवा नूतनीकरणाची तारीख येण्यापूर्वी किमान ३० दिवस आधी ‘इन्श्युरर’ला माहिती देणे योग्य ठरते. त्यांच्या ‘रिटेल हेल्थ इन्श्युरन्स प्रॉडक्ट्स’चा अभ्यास करा, तुमच्या आवश्यकतांचे मूल्यांकन करा आणि सर्वांत योग्य पॉलिसी निवडा. एकदा तुम्ही योग्य उत्पादन निवडल्यानंतर, प्रपोजल, मायग्रेशन फॉर्म आदी कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची विनंती करावी. फॉर्म योग्य माहितीसह भरा, विद्यमान ‘जीएमसी’ पॉलिसीचा तपशील, वैद्यकीय माहिती, दाव्यांचे तपशील आदी माहितीही द्या. ही सर्व माहिती ‘इन्श्युरर’कडे द्या.

## हस्तांतराचे फायदे काय?

सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे, ‘जीएमसी’अंतर्गत आधी पूर्ण केलेला प्रतीक्षा कालावधी ‘रिटेल पॉलिसी’मधील जुने, सध्याचे आजार आणि विशिष्ट आजारांसाठी लागू असलेल्या प्रतीक्षा कालावधीमध्ये समाविष्ट केला जातो (सामान्यपणे तुमच्या आधीच्या ‘सम इन्श्युअर्ड’; तसेच त्यावरील संचयी बोनसपर्यंत). उदा. तुम्ही खरेदी करण्याचा विचार करीत असंलेल्या ‘रिटेल पॉलिसी’मध्ये एखाद्या विशिष्ट आजारासाठी चार वर्षांचा प्रतीक्षा कालावधी आहे आणि तुमच्याकडे तीन वर्षांपासून ‘जीएमसी’ आहे. अशा परिस्थितीत, ‘जीएमसी’अंतर्गत पूर्ण केलेला कालावधी विचारात घेतला जाईल आणि त्या आजारांसाठी तुम्हाला फक्त वर्षाचा प्रतीक्षा कालावधी पूर्ण करावा लागेल (वरील नमूद केलेल्या क्रेडिट मर्यादेच्या अधीन राहून). दुसरा फायदा म्हणजे ‘जीएमसी’ पॉलिसी, ही एकसारख्याच इन्श्युरन्स गरजा असलेल्या लोकांच्या गटाचे संरक्षण करण्यासाठीच तयार केली आहे. ‘रिटेल पॉलिसी’मध्ये हस्तांतर केल्याने तुम्हाला गरजांनुसार संरक्षण निर्धारित करण्याची संधी मिळते. ‘जीएमसी’मध्ये मोतिबिंदू, मॅटर्निटी आदी आजारांसाठी काही मर्यादा असू शकतात; त्या पुरेशा नसतात. ‘रिटेल पॉलिसी’त स्थलांतर करताना, तुम्ही तुमच्या गरजेनुसार अधिक ‘सम इन्श्युअर्ड’ निवडू शकता.

## लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी

- तुम्ही ‘जीएमसी’ला ‘रिटेल प्लॅन’मध्ये हस्तांतर फक्त त्याच ‘इन्श्युरर’सह करू शकता. हे हस्तांतर ‘इन्श्युरर’च्या अंडररायटिंग मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन असते.
- सामान्यतः ‘जीएमसी’ पॉलिसीसाठी तुम्हाला वैद्यकीय तपासणीची आवश्यकता नसते; मात्र हस्तांतराच्या वेळी तुम्हाला वैद्यकीय तपासण्या कराव्या लागू शकतात.
- अनेक जण स्थलांतराच्या वेळी ‘सम इन्श्युअर्ड’ वाढवण्यास प्राधान्य देतात. तथापि, हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे, की प्रतीक्षा कालावधीचा लाभ फक्त ‘जीएमसी’च्या ‘सम इन्श्युअर्ड’पर्यंतच लागू होईल. समजा, ‘जीएमसी’ मधील ‘सम इन्श्युअर्ड’ तीन लाख रुपये आहे आणि तुम्ही नवीन पॉलिसीमध्ये ‘सम इन्श्युअर्ड’ वाढवून पाच लाख रुपये करण्याचा निर्णय घेतला, तर तीन लाखांपर्यंत प्रतीक्षा कालावधीचा लाभ उपलब्ध असेल.
- अतिरिक्त दोन लाख रुपयांसाठी प्रतीक्षा कालावधी पूर्ण करावा लागेल. शेवटी, नवीन पॉलिसीमधील अपवाद आणि मर्यादा समजून घ्या.

(लेखक ‘बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड’मध्ये चीफ टेक्निकल ऑफिसर (कमर्शियल) म्हणून कार्यरत आहेत.)